Indian Streams Research Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4  ISSN:-2230-7850

Research Papers

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल

*प्रा. डॉ. सौ. निलीमा राऊत (कोहळे)*
डॉ. पंजाबराव देशमुख कला वाणिज्य
महाविद्यालय. नागपूर

## *प्रस्तावना :–*

भारतात महिलांचे उध्दारक अनेक झाले. परंतू कैवारी मात्र एकच झाला. आणि तो म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. दोन्ही हाती शस्त्र घेवून स्त्रियांच्या हक्कासाठी लढणारा हा वीर योध्दा म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर. एका हातात कायदयाचे शस्त्र आणि दुस–या हातात चळवळीचे शस्त्र डॉ. आंबेडकरानी आपल्या आयुष्यात सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक अशी चारही क्षेत्रे पादाक्रांत केली. परंतू या पराक्रमाला जोड होती. करूणेची, स्त्रिया आणि शुद्रीही प्रजेवर जातीव्यवस्थेने केलेल्या पराकोटीच्या अन्याय अत्याचाराची चीड व या शोषणाला बळी पडलेल्या विषयी करूणा यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशात सामाजिक क्रांती केली. गौतम बुध्दानंतरची ही दुसरी क्रांती, हिंदू समाजातील सगळया प्रकारच्या विषमतापैकी एक विषमता म्हणजे स्त्री पुरूष विषमता होय. या विषमतेमूळे स्त्रीयांवर होणारे अन्याय दूर करण्यासाठी वापरलेले अस्त्र म्हणजे कायदा होय. हे शस्त्र अंत्यत महत्वाचे होते. स्वतःचे सारे पांडित्य त्यांनी हिंदू कोड बिलासाठीपणाला लावले. स्त्री पुरूष समानता प्रस्थापित करण्यासाठी जुन्या कायदयांची संहिता आधी बदलली पाहीजे व स्त्री केन्द्री बनविली पाहीजे. हा त्यामागील हेतू होता. स्त्रीयांच्या सरंक्षणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी हिंदू कोड बिल तयार केले.

### *भारताचे पहीले कायदामंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर –*

3 ऑगष्ट 1947 रोजी भावी स्वतंत्र भारताच्या मंत्रीमंडळाची निर्मीती करण्यांत आली. हया मंत्रीमंडळात स्वतंत्र भारताचे पहीले कायदेमंत्री म्हणून डॉ. आंबेडकराचा समावेश करण्यांत आला.1

15 ऑगष्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला.स्वतंत्र भारताचे संविधान बनविण्याची महान ऐतिहासीक कामगिरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेवर सोपविण्यात आली. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत स्त्रियांना देखील पुरूषांच्या बरोबरीचा दर्जा देण्याचे महान कार्य डॉ. आंबेडकरांनी केले.2 हया संविधानाबरोबरच संपूर्ण भारताला एका सूत्रात बांधणारा एकच हिंदू कायदा तयार व्हावा अशी गरज होती.

पूर्वी राव कमिटीने हिंदू कोड बिल तयार केले होते. कायदामंत्री डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली कायदेपंडीतांची विद्वानाची व समाजसुधारकांची अशी एकूण 20 लोकांची सिलेक्ट कमिटी 9 एप्रिल 1948 रोजी नेमण्यांत आली. त्यानंतर सर बी. एन. राव यांचे हिंदू कोड बिल फेरतपासणीसाठी हातात घेण्यांत आले.3 पूर्वीचे कोड बिल डॉ. आंबेडकर यांच्या सिलेक्ट कमिटीपुढे मांडण्यात आले. कमिटीने पुन्हा एकदा विवीध कोर्टाचे निकाल, प्रिव्ही कौन्सीलचे निकाल, रूढी, परंपरा धर्मशास्त्रे यांच्या पार्श्वभूमिवर ते काटेकोरपणे तपासले. पूर्वीचे राव कमिटीचे बिल हे केवळ वारसा व विवाह यासबंधीतच मर्यादीत होते. संपूर्ण हिंदू कायद्याच्या संहितीकरणाच्या दृष्टीने हे बिल अपूरे असल्याचे डॉ. आंबेडकराच्या लक्षात आले.

### *डॉ. आंबेडकरांची हिंदू कोड बिलाविषयीची भूमीका –*

या पृथ्वीच्या पाठीवर पुरूषांइतक्याच स्त्रियांही आहेत. त्यांना समान हक्क मिळावयास हवा या मानवतेच्या दृष्टीकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हिंदू कोड बिलाकडे पाहात होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना संपूर्ण समाजव्यवस्थेत परीवर्तन हवे होते. आणि हे परीवर्तन कायद्याच्या माध्यमातून येईल यावर त्यांचा विश्वास होता. डॉ. आंबेडकरानी वारसा, विवाह यासोबतच दत्तक विधान, उत्तराधिकार ,घटस्फोट, पोटगी इ. गोष्टीचांही विचार करून सर्वसमावेशक असा कायदा करण्यासाठी राव कमिटीच्या हिंदू कोडाची पुर्नबांधणी केली आणि हे आगळे वेगळे असे हिंदू कोड बिल डॉ. आंबेडकरानी 12 ऑगष्ट 1948 ला कायदेमंडळापुढे सादर केले. हिंदू कोड बिल 9 भागात 139 कलमात 7 परीशिष्टांत विभागलेले होते.4

हे बिल भारत सरकारच्या 21 ऑगष्ट 1948 रोजी प्रसिध्द झालेल्या गॅझेटच्या 489 ते 550 पृष्ठावर छापून प्रसिध्द करण्यांत आले होते.5

7 फेब्रुवारी 1949 ला कायदेमंत्री डॉ. आंबेडकररांनी आपल्या अहवालासोबत हिंदू कोड बिलाचा पक्का मसूदा लोकसभेपूढे सादर केला. 24 फेब्रुवारी 1949 ला सरकारतर्फे डॉ. आंबेडकरांनी बिलाच्या स्वरूपात हिंदू कोड बिल मांडले.6

Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4

डॉ. आंबेडकरांच्या मते हिंदू कोड बिल हे राज्यघटनेपेक्षाही 100 वेळा अधिक फायदेशीर आहे. कारण त्यामूळे एका नविन समाजाची उभारणी करीत आहोत त्यात न्याय आणि कायदा आहे. हे बिल सर्व भारतीयांकरीता लागू व्हावे असे मला वाटते. या संदर्भात मी कोणहीती तडजोड करण्यांस तयार नाही.

***हिंदू कोड बिलाचा उद्‌देश –***

हिंदू परंपरांवर आधारीत असलेली सामाजिक असमानता भेदभाव आणि क्रुर अशा रूढी चालीरिती आणि नियमांचे उच्चाटन करणे आणि स्त्रियांना समानहक्क प्राप्त करून देणे हा हिंदू कोड बिलाचा मुख्य उद्‌देश होता.7

धार्मिक संस्कारयुक्त विवाह व नोंदणी विवाह घटस्फोट दत्तक विधान या संबधात स्त्रीला केन्द्रस्थानी ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी नव्या तरतुदी केल्या.

हिंदू कोड बिलाने भारतीय स्त्रीला पुरूषाच्या बरोबरीने स्वातंत्र्य देवून तिचा गौरव केला होता. बिलामध्ये –

1. स्त्रिला घटस्फोटाचा अधिकार होता.
2. नव–याने घटस्फोट दिल्यास पोटगी मिळणार होती.
3. व्यक्तीचा एकच विवाह कायदेशिर असल्याने दुस–या विवाहास योग्य कारण नसल्यास बंदी करण्यांत येवून स्त्रीला धैर्य मिळणार होते.
4. स्त्रियांना दत्तक घेण्याचा अधिकार मिळणार होता.
5. मुलाप्रमाणे दत्तक जाण्याचा अधिकार होता.
6. स्त्रीयांचा स्वतःच्या मिळकतीवर अधिकार होता.
7. वडीलाच्या संपत्तीत मुलाइतकाच समान हिस्सा मिळणार होता.
8. मुलीला वारस घेण्याचा अधिकार होता.
9. इतर जातीय विवाहास मान्यता होती.
10. स्त्रीला स्वतःचा वारस निश्चित करण्याचा अधिकार होता.
11. हुंडयाच्या बाबतीत विवाहात मुलीने माहेरून हुंडयाच्या रूपात आणलेली संपत्ती न्याय मालमत्ता मानली जाईल. याशिवाय विवाह व दत्तक विधानातून जातीचे उच्चाटन एकपत्नीत्व तत्व आणि विवाहातून बाहेर पडण्यासाठी घटस्फोटाचे तत्व यांची तरतुद विधेयकात करून स्त्रियांना फार मोठा दिलासा दिला.8

***हिंदू कोड बिलाविषयी समर्थन आणि विरोधी भूमिकांचे समर्थन –***

हिंदू कोड बिलाचा मसूदा तयार झाल्यानंतर तो लोकसभेपूढे मांडण्याची संमती तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे कडे मागितली ते लोकसभेपूढे चर्चेला येण्यापूर्वीच जीर्ण मतवादी सनातनी हिंदूनी जाहीर चळवळी व विरोध दर्शविला. या विरोधकात पहिला विरोध जर कोणी केला असेल तर तो डॉ. राजेन्द्र प्रसाद यांनी स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना 21 जुलै 1948 ला पत्र लिहिले. –

''प्रिय जवाहरलालजी या बिलाचे खूप सारे फायदे असले तरी बिलाच्या दुरगामी परिणामाबद्‌दल लोकात बरेच मतभेद आहेत. त्यामूळे कायदेमंडळ म्हणून कामकाज पाहणा–या घटना समितीने हे बिल पास करू नये.''9

पंडित जवाहरलालजी नेहरू यांचे बिलाबद्‌दल अनुकूल असे मत होते. तेव्हा 22 जुलै 1948 ला त्यांनी उत्तर दिले.

''प्रिय राजेन्द्रबाबू मी व्यक्तीशः हिंदू कोड बिलात समाविष्ट असलेल्या तत्वाशी पूर्णतः सहमत आहे. जे बिल देशहितार्थ आहे व ज्यासाठी अपार परिश्रम घेतले आहेत ते बिल केवळ काही लोक विरोध करतात म्हणून सोडून द्यावे कां?10

डॉ. राजेन्द्रप्रसाद आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यात हिंदू कोड बिलावरून पत्रोपत्री शाब्दीक चकमकी सुरू असतांनाच डॉ. आंबेडकर यांची सिलेक्ट कमिटी हिंदू कोड बिलाच्या प्रत्येक कलमावर चिकीत्सकपणे अभ्यास करून आपला सविस्तर अहवाल तयार करण्यांत गुंतली होती.

7 जुलै 1949 रोजी डॉ. आंबेडकरांनी हे बिल लोकसभेपूढे मांडून दोन तासपर्यंत बिलाचे साधार विवेचन केले. यावेळी प्रेक्षक गॅलरीमध्ये प्रेक्षकांची विशेषतः स्त्रियांची फारच गर्दी झाली होती.11

***हिंदू कोड बिलाचे विरोधक –***

हिंदू कोड बिल लोकसभेपूढे चर्चेला येताच लोकसभेत व लोकसभेबाहेर विरोधकांनी एक आघाडीच निर्माण केली या बिलाबाबत न भूतो न भविष्यती असे तीव्र मतभेद झाले. विरोधकात बाबू राजेन्द्र प्रसाद व सरदार वल्लभभाई पटेल हेही होते. शंकराचार्य ब्रम्हानंद सरस्वती, स्वामी करपात्रीजी डॉ. पद्मश्री सीतारामय्या इत्यादी विद्वान हिंदू लोकांबरोबराच कलकत्यामध्ये निवडून आलेले अजीमुदीन महमंद हे मुस्लीम गृहस्थही विरोधात होते. हिंदुवादी ए. सी. चॅटर्जी हे बिल रद्‌द व्हावे यासाठी आकाश पाताळ एक करीत होते. पंडीत मैत्रा करूणाकरण मेनन कामथ आदींनी या बिलाला आंबेडकर स्मृती म्हटले. पंडीत मुकुंद बिहारीलाल भार्गव यांनी तर भविष्यवाणीच कथन केली. ते म्हणाले '' हिंदू कोड बिल जर पास झाले तर हिंदू समाजाचाच विनाश होईल.'' शकंराचार्य टीका करतांना म्हणाले, ''हिंदू संस्कृतीचे मूळ वर्णाश्रमात आहे. तो धर्म आहे. वर्णाश्रम आमच्या त्रिकालज्ञ महर्षीनी बनविला आहे.'' स्वामी करपात्रीनी सुध्दा असाच विरोध केला.

पुरूषांनी या स्त्री हक्काला विरोध तर केलाच पण स्त्रियाही मागे नव्हत्या. डॉ. शामाप्रसाद मुखर्जीची आई व बी. एन. मुखर्जीची पत्नी रेणू मुखर्जी विरोधकांमध्ये सर्वात पुढे होती.

या बिलाच्या विरोधात संसदेबाहेर लोक मोर्चे काढत. हिंदू कोड बिल मुर्दाबाद. अशा घोषणा देत बाबासाहेबांना खुनाच्या धमक्या देत. जेरेशास्त्रांनी तर अतिशय गलिच्छ टिका केली. ते म्हणाले ''गटारातून आलेले गंगोदक पवित्र मानता येणार नाही.''

या गलिच्छ टीकेला वि. स. खांडेकरानी असे उत्तर दिले की, जेरेशास्त्रासारख्या प्रतिगामी लोकांच्या गटारी विचारांना देखील पावन करण्याचे पावित्र्य डॉ. आंबेडकरांच्या विद्वतेत आहे.12

***हिंदू कोड बिलाचे समर्थक –***

या बिलाचे समर्थन करणा–या वृत्तपत्रामध्ये इंग्रजी ट्रिब्यून हिंदुस्थान स्टॅडर्ड इंडियन एक्सप्रेस (मद्रास) वीर अर्जुन, जागृती (झाशी) हिदुस्थान (दिल्ली) विश्वबंधू (कलकत्ता), इ. याशिवाय जनहितांचा कौल घेण्याच्या दृष्टीने या बिलाच्या सहा हजार प्रती विभीन्न भाषांमध्ये छापून लोकांत वाटल्या. यावर चांगली वाईट चर्चा होवून संविधान सभेत सुचेता कृपलानी, हंसा मेहता श्रीमती दुर्गाबाई, एच. व्ही. कामत यासारख्या समाजसेवकांनी देखील या बिलाचे समर्थन केले.13

श्रीमती जयश्री, श्रीमती पद्यजा नायडू, या लोकसभेतील राजकारणी स्त्रियांनी हिंदू कोड बिलाला भरघोष पाठिंबा दिला. डॉ. बाबासाहेब

Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4

आंबेडकरांचा गौरव करतांना श्रीमती पद्मजा नायडूनी उद्गार काढले की, ''हया बिलाचे निर्माते डॉ. आंबेडकर यांना माझ्या स्मृतीसुमनांची गरज नाही. कारण हया लोकसभेने हे बिल मंजूर केले काय किंवा नाकारले काय, डॉ. आंबेडकरांचे स्थान सामाजिक सुधारणेसाठी जिवापाड श्रम करणा–या समाज सुधारकांच्या रांगेत आहे. सामाजिक अन्याय नष्ट करून मानव जातीच्या सुखाची व कल्याणाचीच सतत त्यांनी अपेक्षा बाळगली आहे.''14 अशाप्रकारे बहुसंख्य नेत्यांचा आणि हिंदुत्वादी लोकांचा हिंदु कोड बिलाला विरोध होता असे आढळून येते. जेव्हाही बिल लोकसभेत चर्चेला येईल त्या प्रत्येक वेळी त्याच त्याच प्रश्नांवर शंकाकुशंका काढून बिल कसे मागे पडेल याचा प्रयत्न हे पुढारी करीत. तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्येकाच्या टीकेला व शंकेला योग्य ती उत्तरे दिलीत. कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, आज सुधारणेच्या युगात स्त्रीयांना समान हक्क द्यायला तुम्ही विरोध कां करता?स्त्रियांना इस्टेटीत वाटा देण्यांस मनूनेही नकार दिला नाही मग तुम्ही कां देता?अशाप्रकारचा सवाल त्यांनी सनातन वृत्तीच्या लोकांना केला. स्त्रीयांच्या अधिकारासाठी हिंदू कोड बिलासाठी एकटे डॉ. बाबासाहेब आंबेडकर लढत राहीले.15

पंडीत जवाहरलाल नेहरूनी शेवटपर्यंत हिंदू कोड बिल मंजूर व्हावे याकरीता आपला पाठिंबा डॉ. आंबेडकराना दिला होता. परंतू हिंदू कोड बिल जर मंजूर झाले तर याचा परिणाम आगामी होणा–या निवडणुकांवर होईल असे कॉग्रेस पुढा–यांनी पंडीत जवाहरलाल नेहरूंना स्पष्टपणे सांगितले.

बिलामध्ये फेरबदल करण्याकरीता पंडित नेहरूनी डॉ. आंबेडकरांशी चर्चा केली परंतू डॉ. आंबेडकर ज्या स्वरूपात बिल तयार झाले त्याच स्वरूपांत ते मंजूर व्हावे या आपल्या भूमिकेपासून तसूभरही हलत नाही. हे पाहून सरतेशेवटी पंडित जवाहरलाल नेहरूंना 1952 ला होणा–या निवडणुकांत कॉग्रेस पक्ष सत्तेवर येण्यासाठी मतदारांच्या जीर्णमतवादापुढे मान झुकवावी लागली.

***डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मंत्रीपदाचा राजीनामा –***

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हिंदू कोड बिल पारीत करण्यासाठी अक्षरशः अहोरात्र झटले. डॉ. बाबासाहेब आबेंडकराच्या दृष्टीकोनातून हिंदू कोड बिल ही एक महत्वाची घटना होती.

26 सप्टेंबर 1951 ला पंडित जवाहरलाल नेहरू यांनी हिंदू कोड बिलाला होत असलेला विरोध लक्षात घेवून हिंदू कोड बिल आता स्थगित करीत आहोत असे जाहीर केले.16

तेव्हा जर कुणास अधिक दुःख झाले तर ते डॉ. आंबेडकरांस स्वतःच्या मुलाचा मृत्यु झाला असता तरी अधिक दुःख त्यांना झाले नसते त्यावेळी डॉ. आंबेडकरांच्या तोंडून पुढील उद्गार निघाले. ''हिंदू कोड बिलाला ठार मारण्यांत आले आणि त्याची उत्तरक्रिया करण्यांत आली. पण कुणी अश्रु ढाळले नाहीत की कुणी भावना व्यक्त केल्या नाहीत.17

त्यानंतर दुस–याच दिवशी म्हणजे 27 सप्टेब र 1951 ला डॉ. आंबेडकरांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. व्यक्तीपेक्षा देश मोठा मानणा–या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक नितीमत्ता इतकी श्रेष्ठ दर्जाची होती की त्यांनी कधी तडजोड केली नाही. तत्वापेक्षाद पक्ष मोठा मानण्याची पाळी पंडीत नेहरू यांच्यावर हिंदू कोड बिलाच्या निमीत्ताने आली आणि बाबासाहेब त्याचक्षणी मंत्रीमंडळातून बाहेर पडले.18
राजीनाम्यात त्यांनी लिहीले होते की, पार्लमेंटपुढील हिंदू कोड बिल ही एक अंत्यत महत्वपूर्ण घटना होती. पार्लमेंट पुढे यापूर्वी आलेल्या किंवा यानंतर येणा–या कोणत्याच कायद्याची बरोबरी या हिंदू कोड बिलाबरोबर करता येणार नाही असे त्याचे महत्व आहे. ..... यावरून मी हिंदू कोड बिलाला एवढे महत्व कां देतो याची आपणांस कल्पना येईल.

टाईम्स पत्राने सोमवार 1.10.51 ला डॉ. बाबासाहेबांवर अग्रलेख लिहीला ते लिहीतात – ''भारताच्या मंत्रीमंडळात बुध्दीमत्तेचा प्रकाशझोत टाकणा–या व्यक्ती फारशा नाहीत आणि अशा स्थितीत आंबेडकरांसारख्या स्वंयप्रकाशीत पंडिताला मंत्रिमंडळातून बाहेर पडावे लागले त्यामूळे मंत्रीमंडळातील प्रकाशझोत मंदावला. हिंदू कोड बिलामूळे समान कायदा करण्याच्या प्रक्रियेला गती मिळणार होती.19
1951 मध्ये डॉ. आंबेडकरांचे हिंदू कोड बिल मंजूर झाले नाही हे ख–या अर्थाने भारतीय समाजाचे दुर्दव होय. हिंदू कोड बिलातील तरतुदीचे महत्व लक्षात घेवून पुढे त्याला बराचसा फेरबदल करून वेगवेगळया भागात विभाजन करून कायदेरूपाने मंजूर करण्यांत आले.

1. विशेष विवाह कायदा. 1955
2. हिंदू विवाह कायदा 1955
3. हिंदू उत्तराधिकार कायदा 1956
4. हिंदू दत्तक ग्रहण आणि निर्वाह कायदा 1956, अशा प्रकारे हिंदू कोड बिलाची निरनिराळे भाग करून आणि त्यात बराच बदल करून कायदे बनविण्यांत आले.20 हिंदू कोड बिल संपूर्णपणे पारीत कले नसले तरी कालांतराने त्यातील एक एक कलम कायदा होत आहे.

***सारांश –***

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले हिंदू कोड बिल म्हणजे स्त्री गुलामीला लावलेला सुरूंग होता. अंधार संपविणारा प्रकाशझोत होता. डॉ. आंबेडकरांचे हिंदू कोड बिल हे स्त्रियांना आर्थिक सामाजिक आणि धार्मिक स्वातंत्र्यमिळवून देण्याचे महत्वपूर्ण असे एक मोठे साधन होते. भारतीय संविधानातील न्याय स्वातंत्र आणि समता याची हमी मिळणार होती.
हिंदू कोड बिलाच्या रूपाने सर्वाकरीता समान कायदे अस्तित्वात आणून जाती, धर्मभेद विरहीत आणि स्त्री पुरूष भेद विरहीत समाज निर्माण करण्याचे डॉ. आंबेडकरांचे उदिष्ट होते. प्राचीन जात धर्म स्त्री पुरूष भेदाच्या संकल्पना त्यागून आधुनिक प्रगत आणि पुरोगामी विचारसरणीची समाजव्यवस्था निर्माण करणे हे हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून साध्य करायचे होते.
जर डॉ. आंबेडकरांची हिंदू कोड बिलामागील भूमिका ओळखून हिंदू कोड बिल पास होवू दिले असते तर सामाजिक परीवर्तनाच्या प्रक्रियेला 1951 पासूनच सुरूवात झाली असती.

***संदर्भ ग्रंथ सुची –***

1. शरणकुमार लिंबाळे, प्रज्ञा–सूर्य, प्रचार प्रकाशन., कोल्हापूर 1991, पृ. 107.
2. सुभाष गवई., बहुआयामी डॉ. बाबासाहेब आंबेडकर., ऋचा प्रकाशन, नागपूर, प्र.आ. 2004, पृ. 38.
3. सुशिला मूलजाधव., भगवान बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री, कौशल्य प्रकाशन, प्र.आ. 2006 पृ. 86.
4. ज्योती लांजेवार., फुले, आंबेडकर आणि स्त्री मुक्ती चळवळ, संकेत प्रकाशन, नागपूर
पृ.58
5. कित्ता
6. चा. भ. खैरमोडे, डॉ. आंबेडकर आणि हिंदू कोड बिल, सुगावा प्रकाशन, पुणे, 1992 पृ. 71.

7. कित्ता
8. रत्नाकर गणवीर, डॉ. आंबेडकर आणि हिंदू कोड बिल, रत्नमित्र प्रकाशन, बेझनबाग, नागपूर 1987, पृ. 39.
9. कित्ता
10. मिनाक्षी मून, महात्मा फुले आंबेडकरी, स्त्री चळवळ, समता प्रकाशन, नागपूर 2002, पृ. 189.
11. डॉ. एल. आर. बाली, डॉ. आंबेडकर और हिंदू कोड बिल, भिमपत्रिका पब्लीकेशन, जालंदर, पंजाब, 1989, पृ. 198
12. . च. भ. खैरमोडे पृ. 253
13. उर्मिला पवार, मिनाक्षी मून, आम्हीही इतिहास घडविता, स्त्री उवाच प्रकाशन, मुंबई (1989) पृ. 89.
14. रत्नाकर गणवीर पृ. 195.
15. दिनेश मोरे, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास के. एस. पब्लीकेशन पुणे 2006, पृ. 313–314
16. राजस वसंत , स्त्रियांचे उध्दारक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आनंद प्रकाशन जयकिंगपूरा, औरंगाबाद.
17. कित्ता
18. खैरमोडे चा. भ., डॉ. भीमराव रामजी आंबेडकर खंड 10, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 1989, पृ. 98.
19. वसंत मून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, दिल्ली 2009, पृ. 124.
20. दया पवार (संपा) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई–32, 1993 पृ. 567.